महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


==============================================================================

जावक क्रमांक – ५०५/१५ दिनांक :- ०८ फेब्रुवारी, २०२५

**प्रसिद्धिपत्रक**

# 'म्हाडा'मध्ये विशेष स्वच्छता व अभिलेख वर्गीकरण मोहीम

## 'म्हाडा'तर्फे १०० दिवसांच्या कृती आराखड्याची प्रभावी व तत्परतेने अंमलबजावणी

मुंबई , दि. ८ फेब्रुवारी, २०२५ - नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) प्रशासनाने 'म्हाडा'च्या मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व विभागीय मंडळांच्या कार्यालयांमध्ये या कृती आराखड्याची तत्परतेने अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या निर्देशानुसार म्हाडामध्ये आज व उद्या स्वच्छता मोहीम व अभिलेख वर्गीकरण करून तपासाअंती नष्ट करण्याची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी आज स्वतः या म्हाडा कार्यालयातील प्रत्येक कार्यालयातील कामकाजाची प्रत्यक्ष सुमारे तीन तास पाहणी करीत आढावा घेतला. या पाहणी दरम्यान संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यालयामधील संगणक, टेबल, खुर्च्या, कपाटे आदी जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट लावण्यात यावी, कार्यालयाच्या आवारात असणारी जुनी व वापरात नसलेली वाहने यांचे विहित पद्धतीने निर्लेखन करण्याचे निर्देश त्यांनी दिले. या निर्देशानुसार म्हाडामध्ये आज व उद्या अशी दोन दिवस सदर विशेष मोहीम राबविण्यात येत असून कार्यालयीन सुटीच्या दिवशी म्हाडाच्या मुंबईस्थित मुख्यालयात आज सुमारे ७०० अधिकारी-कर्मचारी उत्स्फूर्तपणे या मोहिमेत सहभागी झाले आहेत. आजच्या या मोहिमेत म्हाडाच्या मुंबईस्थित प्रत्येक कार्यालयातील अभिलेखाचे अ, ब, क असे वर्गीकरण करण्याचे काम करण्यात येत असून ड वर्गातील अभिलेख नष्ट करावयाचे काम करण्यात येत आहे. आजच्या मोहिमेत सुमारे एक लाख नस्त्यांचे वर्गीकरण करण्यात आले असून अभिलेखाचे निंदणीकरण, नष्टीकरण व निर्लेखन प्रक्रिया वेगाने करण्यात येत आहे. सदर कामासाठी म्हाडा कर्मचाऱ्यांना ५०० हून अधिक मजूर, सफाई कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यासाठी वाहने, इतर साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

श्री. जयस्वाल यांनी म्हाडा मुख्यालयाच्या पाच मजली इमारतीतील प्रत्येक कार्यालयांस भेट दिली. कार्यालयात तसेच कार्यालयाबाहेरील मोकळया जागेत अडचण निर्माण करणारे व निकामी झालेले फर्निचर

व इतर अनावश्यक वस्तूंची विल्हेवाट लावण्यासाठी मुख्य अभियंता श्री. महेश जेस्वाणी यांच्या निर्देशाखाली समिती स्थापन करण्यात आली असून या समितीद्वारे भवनातील स्वछता मोहीम राबविण्याचे कार्य सोपविण्यात आले आहे. म्हाडा कार्यालय नागरिकांसाठी आज खुले नसले तरी सर्व कर्मचारी उपस्थित राहून कार्यालयातील स्वछता मोहिमेचे कार्य पार पाडताना दिसत होते.

राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार, नागरिकांचे जीवन सुखकर करणे या बाबीवर प्राधान्य देण्यात आले आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुलभूत कर्तव्यांचा तो महत्त्वाचा भाग असल्यामुळे नागरिकांना देण्यात येणाऱ्या सुविधांना अधिक महत्व दिले गेले पाहिजे, असे निर्देश श्री. जयस्वाल यांनी याप्रसंगी दिले. श्री. जयस्वाल म्हणाले की, म्हाडास भेट देणाऱ्या अभ्यागतांसाठी बसण्याची व्यवस्था तसेच त्यांना पिण्याचे पाणी भवनात ठिकठिकाणी व प्रत्येक कार्यालयात उपलब्ध करून देण्यात यावे. अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या भेटीसाठी निश्चित वेळ ठरवावी जेणेकरून नागरिकांची गैरसोय टाळता येऊ शकेल. तसेच गृहप्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी अधिकाऱ्यांनी फिल्ड व्हिजिट घेणे आवश्यक असल्याचे सांगत फिल्ड व्हिजिट आठवड्याच्या शेवटी निश्चित कराव्यात व याबाबत नागरिकांना अवगत होईल असे नियोजन असावे , असे निर्देश याप्रसंगी दिले.

म्हाडा हे एक लोकाभिमुख कार्यालय असल्याने कार्यालयास भेट देणाऱ्या नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी नागरी सुविधा केंद्र (Citizen Facilitation centre) उभारण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले आहेत. आज श्री. जयस्वाल यांनी या केंद्राच्या उभारणीच्या कामाचा आढावा प्रत्यक्षस्थळी भेट देऊन घेतला. तसेच विझीटर मॅनेजमेंट सिस्टमचा देखील त्यांनी यावेळेस आढावा घेतला.

तसेच या पाहणी दौऱ्यादरम्यान त्यांनी म्हाडातील प्रांगणात उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्षाला देखील भेट दिली व तेथे महिलांकरिता असलेल्या सुविधा व सुरक्षा नियोजनाचा देखील आढावा घेतला.

म्हाडातील विविध मंडळाकडून नागरिकांना नागरिकांना दिल्या जाणाऱ्या ऑनलाईन सेवांच्या सज्जतेचा आढावा देखील त्यांनी आज घेतला. ते म्हणाले की, म्हाडाचे संकेतस्थळ सर्व माहितीने परिपूर्ण असावे. जेणेकरून माहितीचा अधिकार वापर करून नागरिक जी माहिती विचारतात ती विभागांनी आधीच पारदर्शकपणे संकेतस्थळावर उपलब्ध करावी. तसेच म्हाडाचे संकेतस्थळ हे जनतेशी संवाद साधणारे असावे जेणेकरून नागरिकांना त्यांच्या प्रश्नांचे निराकरण ऑनलाइन होईल. प्रत्येक विभागाने नागरिकांची सनद आपल्या कार्यालयाबाहेरील दर्शनी भागात लावावी, असे निर्देशही विभाग प्रमुखांना यावेळी दिले. तसेच याप्रसंगी कागदविरहित प्रशासनावर भर देणारी ई–ऑफिस प्रणालीच्या कार्यक्षमतेची देखील त्यांनी आढावा घेतला.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial










Gokul







**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

Outward No. : 505/15 Dt. February 8, 2025

Press Release

## MHADA Headquarters undergoes major cleanliness and record disposal drive

MHADA accelerates action plan as part of Government's 100-Day Initiative

Mumbai, February 8, 2025: In accordance with the directives of Chief Minister Mr. Devendra Fadnavis and as per the instructions of Deputy Chief Minister and Housing Minister Mr. Eknath Shinde, a 100-day action plan has been launched to improve administrative efficiency and enhance citizen services. Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) has started the immediate implementation of this plan across all its divisional offices in Mumbai and other parts of the state.

Under the guidance of MHADA VP & CEO, Mr. Sanjeev Jaiswal, IAS, a special cleanliness and record classification drive is being carried out at MHADA's headquarters in Bandra East on February 8 and 9, 2025. As part of this initiative, cleanliness activities are being undertaken along with the classification and systematic disposal of outdated records.

Today, Mr. Sanjeev Jaiswal personally inspected various offices in the MHADA headquarters for nearly three hours, reviewing their functioning. During the inspection, he directed employees to dispose of old and unused items, including outdated computers, tables, chairs, and cabinets. He also instructed officials to remove non-operational vehicles in a proper manner.

This two-day special drive has seen the active participation of nearly 700 officers and employees of MHADA's Mumbai headquarters, despite it being a non-working day. In today's exercise, official records are being categorized into A, B, and C groups, while outdated D-category records are being eliminated. Approximately one lakh files have been classified in a single day, and the process of disposal and documentation is being carried out

at a rapid pace. To support this effort, more than 500 workers and cleaning staff have been assigned to the task, along with the necessary transport and equipment.

During his visit, Mr. Jaiswal personally inspected every office across all five floors of the MHADA headquarters. To ensure proper implementation of the cleanliness drive, a special committee has been formed under the guidance of Chief Engineer Mr. Mahesh Jeswani. This committee has been given the responsibility of overseeing the removal of unusable furniture and unnecessary items.

While the headquarters remains closed to the public for this drive, all employees have been present to actively participate in the initiative. Mr. Jaiswal emphasized that improving citizen services is a top priority and a fundamental duty of government employees.

To provide a better experience for visitors, Mr. Jaiswal instructed that proper seating arrangements and drinking water facilities be made available throughout the premises. He also directed that specific visiting hours be designated for public interactions so that citizens do not face inconvenience.

He further emphasized the importance of field visits by officials to review housing projects and instructed that such visits be scheduled at the end of the week. He also stressed that proper communication must be maintained so that citizens are aware of these visits in advance.

Since MHADA is a public-facing organization, Mr. Jaiswal has directed the establishment of a Citizen Facilitation Centre to improve the delivery of services. Today, he personally visited the site and reviewed its progress. He also assessed the implementation of a Visitor Management System, which will streamline visitor interactions.

During the inspection, he visited the Hirakani Kaksha, a dedicated facility providing essential amenities for breastfeeding mothers and expectant women, on the MHADA premises and reviewed the safety measures and facilities available for women employees and visitors.

Mr. Jaiswal also assessed the efficiency of online services provided by MHADA's various divisions. He stressed that MHADA's website should be fully equipped with necessary information so that citizens can easily access details without needing to file Right to Information (RTI) requests. Each department has been instructed to display a Citizen

Charter at the entrance of their offices for public awareness. He also reviewed the functionality of the E-Office system, which aims to enhance efficiency through paperless administration.

###

(Vaishali Gadpale)

Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial